# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१ दि. २१ डिसेंबर, २०२१

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

जळगाव दि.२१ ( ): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन परीक्षा मंगळवार, दि.२१ डिसेंबर पासून सुरळीत सुरु झाल्या असून पहिल्या दिवशी परीक्षेसाठी लॉगीन झालेला कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहीला नाही.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची डिसेंबर २०२१/जानेवारी २०२२ मधील परीक्षांना मंगळवारपासून प्रारंभ झाला. या सर्व परीक्षा ऑनलाईन होत आहेत. परीक्षेसाठी ५८ हजार विद्यार्थी प्रविष्ठ आहेत. पहिला दिवशी विविध अभ्यासक्रमांच्या ५७ विषयांची परीक्षा होती. दुपारी ३ वाजेपर्यंत ५ हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. सायंकाळपर्यंत अनेक विद्यार्थी परीक्षेसाठी लॉगीन झाले होते. ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी उदभवल्या त्या महाविद्यालयामध्ये नियुक्त करण्यात आलेल्या आय.टी. समन्वयकांमार्फत तत्काळ दूर करण्यात आल्या त्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिला नाही. विद्यापीठाने परीक्षा विभागात वॉर रुमची स्थापना केली असून प्रा.के.एफ.पवार, डॉ.सी.टी.आगे आणि प्रा.मनोज पाटील यांनी पहिल्या दिवशी या तांत्रिक अडचणी दूर केल्या. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.दीपक दलाल यांनी दिली.

---

प्रति,
मा. संपादक/प्रतिनिधी,
महोदय,
आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी